SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR– 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell: 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष :०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/ एआयएसएचई /२०२४-२५/ 120 दिनांक : 25/07/2025

# परिपत्रक

**प्रति,**
**मा. प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२४-२५**
वेब डीसीएफ मध्ये माहिती भरणे व अपलोड करणेबाबत...

**संदर्भ : मा.डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण संचालक (उच्चशिक्षण) महाराष्ट राज्य, पुणे यांचे क्र .उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२४-२५/२०२५/E-१९९३५६, दिनांक २३/०७/२०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी **अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०२४-२५** वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (**www.aishe.gov.in**) माहिती नोंद करण्याची सुरवात झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०२४-२५ सालातील माहिती तात्काळ वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्याबाबत खालील सुचना मा. प्राचार्य यांनी आपल्या महाविद्यालयाच्या नोडल अधिकारी यांनी देवून त्याप्रमाणे कार्यवाही करून घ्यावी.

१. महाविद्यालयाच्या एआयएसएचई नोडल अधिका-यांनी Web DCF व TIF फॉर्ममध्ये माहिती काळजीपुर्वक नोंद करावी. आपण नोंद केलेली माहिती नॅक मुल्यांकनासाठी उपयोग होणार आहे. तसेच महा. डीबीटी पोर्टल, एआयसीटीई माहिती नोंद करताना एआयएसएचई वेबपोर्टलचा उपयोग होणार असल्याने आपण माहिती अचूक व काळजीपुर्वक नोंद करावी. एआयएसएचई वेबपोर्टलवर नोंद केलेल्या माहितीची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयांची राहील याची आपण कृपया नोंद घ्यावी.
२. महाविद्यालयांनी वेबपोर्टलवर सन २०२४-२५ ची माहिती व्यवस्थितरित्या नोंदविल्याचे तसेच ती पडताळुन बरोबर असल्याचे प्रमाणपत्र प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने हार्ड कॉपी विद्यापीठाकडे पाठवावी व सॉफ्ट कॉपी मा. शिक्षण संचालक कार्यालय, पुणे यांच्या stat.dhepune@nic.in या ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावी. **(सोबत प्रमाणपत्राचा नमुना जोडलेला आहे.)**
३. उपरोक्त प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाकडून आपणास ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे तद्नंतर आपले विद्यापीठातील प्रशासकीय कामकाज पुर्ण होणार आहे यांची कृपया आपण नोंद घ्यावी.
४. वेबपोर्टलवर माहिती नोंद केल्यानंतर आपले बॅकेचे नाव, बॅक खाते क्रमांक, पॅन क्रमांक, IFSC कोड अद्ययावत करावा. आपण जर सदरची माहिती अद्ययावत केली नाही तर आपल्यास सदरचे फॉर्म भरल्याबाबतचे मानधन मिळणार नाही यांची कृपया आपण नोंद घ्यावी.
५. AISHE व MIS वेबपोर्टलवर आपल्या महाविद्यालयांचे नोडल अधिकारी तसेच महाविद्यालयांचे संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी तपासावे तसेच विद्यापीठाने महाविद्यालयांना दिलेले ई-मेल आयडी वेबपोर्टलवर नोंद करावे. जेणेकरून पत्र व्यवहार करणे सोईस्कर होईल.
६. वेबपोर्टलवर माहिती भरण्याबाबतची जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्याचे नियोजित आहे. कार्यशाळेच्या दिनांकाबाबत स्वतंत्ररित्या आपणास कळविण्यात येईल.
७. महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी आपल्या महाविद्यालयांची AISHE अनुषंगाने **माहिती वेबपोर्टलवर दि.३१/०८/२०२५ पर्यत नोंदवून विद्यापीठास सहकार्य करावयाचे आहे.**
८. **वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता कांही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**